# सहोक्ति अलङ्काराची सोदाहरण समीक्षा

**सौ. धनश्री शेजवलकर,**
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

**प्रस्तावना :**

संस्कृत साहित्य हे गेल्या जवळ जवळ तीन सहस्रकाहून अधिक काल भारतीय उपखंडातील मानवाच्या संस्कृतीचा आरसा म्हणून अभ्यासले गेले आहे. चार वेदांच्या संहिता, ब्राह्मण ग्रंथ, आरण्यके, उपनिषदे, सहा वेदांगे हे वैदिक साहित्य सर्वांत प्राचीन साहित्य म्हणून गणले जाते. त्यानंतर रामायण आणि महाभारत ही आर्ष महाकाव्ये आजही भारताची ओळख म्हणून समजली जातात. त्यानंतर रचल्या गेलेल्या महापुराणांनी आणि उपपुराणांनी भक्तीची मोठीच शिकवण समाजाला दिली. या साहित्याबरोबरच संस्कृतमधील शास्त्रांच्या परंपरेचा आणि त्यातील ग्रन्थसंपदेचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. व्याकरण, साहित्यशास्त्र, दर्शनशास्त्र अशा विविध शास्त्रांची विपुल प्रमाणात साहित्यनिर्मिती संस्कृतमध्ये झाली.

संस्कृत वाङ्मयामध्ये साहित्यशास्त्राची भूमिका महत्त्वाची आहे. यालाच अलंकारशास्त्र असेही नाव आहे. अलङ्कार, रस, रीती, गुण, वक्रोक्ति इत्यादि विविध विषयांचा समावेश साहित्यशास्त्रात होतो. शब्द आणि अर्थ यांचे परस्पर अनुरूप असे सौंदर्य साहित्यामध्ये अभिप्रेत असते. ते खुलवण्यासाठी विविध शब्दालंकार व अर्थालंकार योजले जातात. अलंकार म्हणजे दागिना, आभूषण, ज्याप्रमाणे मानवाच्या मूळच्या सौंदर्याला वेगवेगळ्या प्रकारचे अलंकार खुलवितात, तसे भाषेलाही शब्दाचे आणि अर्थाचे निरनिराळे अलंकार अजून शोभा आणतात. म्हणूनच जवळजवळ सर्वच साहित्यशास्त्रकारांनी अलंकारांचा सखोल विचार केलेला आहे. काव्यमीमांसा[१] या ग्रंथात राजशेखराने अलंकारांना वेदांचे सातवे अंगच मानले आहे.

साहित्यशास्त्रामधे अलंकार स्थूलमानाने दोन प्रकारे सांगितले आहेत- पहिला शब्दालंकार व दुसरा अर्थालंकार, कर्णमधुरत्व हे शब्दालंकारात महत्त्वाचे असते तर अर्थाला खुलविणाऱ्या शाब्दिक कोट्या व कृत्या अर्थालंकारात महत्त्वाच्या ठरतात.

साहित्यशास्त्राच्या वेगवेगळ्या ग्रंथांत अर्थालंकारांची संख्या वेगवेगळी मानली आहे. इसविसनाच्या बाराव्या शतकात होऊन गेलेल्या रुय्यकाने[२] पंच्याहत्तर अर्थालंकारांचा विचार केलेला आहे तर सतराव्या शतकातील अप्पय दीक्षित[३] यांनी आपल्या कुवलयानंद या ग्रंथात एकशे तेवीस अर्थालंकारांचा विचार केलेला आहे. प्रस्तुत निबंधात सहोक्ति या अर्थालंकाराचा समीक्षात्मक विचार केलेला आहे.

**भूमिका :**

अर्थालंकारांचे सादृश्यमूलक व विरोधमूलक असे दोन प्रकारांनी वर्गीकरण केले जाते. त्यातील सादृश्यमूलक वर्गातील एक अलंकार म्हणजे सहोक्ति. सादृश्यावर आधारित अर्थ जिथे महत्त्वाचा असतो तो म्हणजे सादृश्यमूलक. या अलंकाराचे सामान्यतः स्वरूप पुढील प्रमाणे असते–

''सहभावस्य भावः सहोक्ति'' : अनेक पदार्थांबरोबर एकाच धर्माचा उल्लेख असतो. यातील प्रधानधर्मी पदाचा प्रयोग कर्ता कारकात होतो तर गौणधर्मीचा प्रयोग करणकारकात होतो. सहोक्तिवाचक शब्द सह, साकम्, सार्धम, समम्, सजुः इत्यादि शब्द असताना किंवा नसतानाही सहार्थ विवक्षा असताना सहोक्ति होऊ शकते. या सहार्थ विवक्षेत काहीतरी चमत्कृतीपूर्ण अर्थ असेल तरच हा अलंकार होतो. नाहीतर ते विधान केवळ सहार्थाचे वाचक असते. प्रस्तुत निबंधात या अलंकाराची चार प्रातिनिधिक लक्षणे आणि त्याची काही उदाहरणे विचारात घेतली आहेत.

**लक्षणे**

१) सहोक्ति अलंकाराचे दंडीकृत काव्यादर्श[४] या ग्रंथातील लक्षण -

सहोक्तिः सहभावेन कथनं गुणकर्मणाम् ।

गुण, क्रिया द्रव्य यांच्या एकाच वेळी अस्तित्वाचे कथन म्हणजे सहोक्ति, म्हणजे जिथे संबंधी पदापेक्षा भिन्न असणारे गुण, क्रिया व द्रव्य सहार्थक शब्दाच्या मदतीने एकाच वेळी सांगितले जातात तेव्हा त्यांना सहोक्ति मानले जाते.

२) मम्मटकृत काव्यप्रकाशातील सहोक्तीचे लक्षण -

सा सहोक्तिः सहार्थस्य बलादेकं द्विवाचकम्

म्हणजे शब्दशक्तीने एकाच अर्थाचे अभिधायकत्व असूनही सहार्थाच्या बलाने व अन्वयाने दोन्ही अर्थाचे अवगमन व बोधन होत असेल तर सहोक्ति हा अलंकार होतो.

३) विश्वनाथकृत साहित्यदर्पणातील[५] सहोक्तिचे लक्षण-

सहार्थस्य बलादेकं यत्र स्याद्वाचकं द्वयोः
सा सहोक्तिर्मूलभूतातिशयोक्तिर्यदा भवेत् ।।

या लक्षणात काव्यप्रकाशानी लक्षणाची पुरसक्ति येते. पण अतिशयोक्ति किंवा चमत्कृतीपूर्ण रचना ही सहोक्ति करिता आवश्यक सांगितली आहे.

विश्वनाथ सहोक्तीचे मालारूपात पण उपयोजन सांगतो.

४) अप्पय दीक्षित विरचित कुवलयानंद या ग्रंथातील सहोक्तीचे लक्षण-

सहोक्तिः सहभावचेद्भासते जनरञ्जनः ।

या लक्षणात चमत्कृतिजनकत्व हे सहोतीचे महत्त्वाचे लक्षण आले आहे.

**लक्षणांबद्दल समीक्षक चिंतन**

आत्ता पर्यंत सांगितलेल्या लक्षणांनी हे स्पष्ट होते कि सहोक्ति मध्ये केवळ सहार्थक शब्द हे लक्षण नसते तर प्रधानधर्मी आणि गौणधर्मी यांचे. क्रमाने कर्ताकारक व करणकारक या मधील प्रयोग हे अभिप्रेत आहेत. येथे वैयाकरण पाणिनीच्या अष्टाध्यायातील एक सूत्र लक्षात घेतलेले दिसते. ते सूत्र म्हणजे सहयुक्तेऽप्रधाने सूत्र क्रमांक २.३.१९. म्हणजे सहार्थं योगाने अप्रधान तृतीया असतानाच हा अलंकार होतो.

लक्ष्मणेन समं रामः काननं गहनं ययौ । किंवा
अनेन सार्धं विहराम्बुराशेस्तीरेषु तालीवनमर्मरेषु

इथे नुसती सहार्थभाव असणारी विधाने झाली. सहोक्ती अलंकार नाही. मात्र पुढील काही उदाहरणांनी हे स्पष्ट होईल कि संस्कृत कवींनी विरळपणे का होईना पण या अलंकाराचा समर्पक वापर केलेला आहे.

**उदाहरणे**

पहिले उदाहरण आहे महाकवी कालिदासाच्या रघुवंश या महाकाव्याच्या अष्टम सर्गातील. ते असे आहे-

सममेव नराधिपेन सा गुरुसम्मोहविलुप्तचेतना ।

अगमत्सह तैलबिन्दुना ननु दीपार्चिरिव क्षितेस्तलम् ।।

इथे नारदाच्या पुष्पमालेच्या गळ्यात पडण्याने चेतना हरपलेल्या इंदुमतीचे वर्णन करताना महाकवी कालिदासाने सहोक्तीचा अत्यंत समर्पक वापर केलेला दिसतो. कालिदास इथे त्याचा हातखंडा असणारी उपमा पण उपयोजतो आणि म्हणतो कि राजा अज व इंदुमती दोघेही भूमीवर पडली जणू तेलाच्या बिन्दुबरोबर दिव्याची ज्योत पण जमिनीवर पडली. इथे कवीने तेलाचा दिवा विझत आला असतानाचे सूक्ष्म निरीक्षण केलेले दिसते. दिवा विझत आला की तेलाचा थेंब आणि वात दोन्ही एकदमच नष्ट होतात, तसे राजा व इंदुमती हेपण एकदमच जमिनीवर पडले. इथे प्रधान कर्ताकारक म्हणून इंदुमतीला व दिव्याच्या ज्योतीला महत्त्व द्यायचे असल्याने त्यांची प्रथमा केलेली दिसते. तर इंदुमती बरोबर खाली पडणारा राजा व तेलाचा बिंदू यांची गौण करणकारक म्हणून तृतीया केलेली दिसते. व्यवहारातही तेलाचा थेंब पडला तर ते महत्त्वाचे नसते तर ज्योत विझते हे महत्त्वाचे असते. तसेच इथे पण इंदुमती मृत झाली आहे याला महत्त्व द्यायचे म्हणून सहोक्तीचा समर्पक वापर केला आहे.

दुसरे उदाहरण आहे. कालिदासाच्याच मेघदूत[६] या खंडकाव्यातील, उत्तरमेघामध्ये आपल्या घरातील क्रीडापर्वतावर असणाऱ्या दोन वृक्षांचा उल्लेख यक्ष करतो. तो म्हणतो–

रक्ताशोकश्चलकिसलयः केसरश्चात्र कान्तः
प्रत्यासन्नौ कुरबकवृतेर्माधवीमण्डपस्य
एकः सख्यास्तव सह मया वामपादाभिलाषी
काङ्क्षन्त्यन्यो वदनमदिरां दोहदच्छद्मनास्यः ।।

यामध्ये विप्रलम्भ शृंगाराचा परिपोष करताना यक्ष मेघाला सांगतो आहे कि माधवी मंडपाच्या जवळ असलेल्या रक्ताशोकाला माझ्या सह असलेल्या तुझ्या मैत्रिणीच्या डाव्या पायाची अभिलाषा आहे तर दुसऱ्या बकुल वृक्षाला तिच्या मुखातील मदिरेची इच्छा आहे.

इथे सुंदर स्त्रीच्या डाव्या पायाची लाथ बसली तर लाल अशोक फुलतो आणि तिच्या तोंडातील मदिरेची चूळ पडली तर बकुलवृक्ष फुलतो या कविसंकेतांचा वापर कवी करतो. खरे तर तिथे कविसंकेताप्रमाणे कोणत्याही पुरुषाचे म्हणजेच यक्षाचे प्रयोजन नाही. मात्र इथे आता पक्षाला आपल्या पत्नीची आठवणं इतकी अनावर झाली आहे कि तो माझ्या बरोबर असणारी तुझी मैत्रीण असा उल्लेख मुद्दाम करतो.

यक्षाच्या मनातील आतुरता दाखविण्यासाठी या सहोक्तीचा समर्पक वापर कालिदासाने केला आहे. तिसरे उदाहरण आहे महाकवि भारवीच्या किरातार्जुनीयम् या महाकाव्यातील पहिल्या सर्गात द्रौपदी युधिष्ठिराला युद्धाला प्रवृत्त करते आहे. आता अगदी प्राणावर बेतायची वेळ आली आहे. म्हणून पराक्रम प्रकट कर असे राजाला सांगत असताना ती म्हणते.

पुरोपनीतं नृप रामणीयकं द्विजातिशेषेण यदेतदन्धसा ।
तदद्य ते वन्यफलाशिनः परं परैति कार्श्यं यशसा समं वपुः ।।

आपला पती युधिष्ठिर याला द्रौपदी अगदी पोटतिडकीने समजावते आहे कि तुझी अकीर्ति तर झालीच आहे पण आता अस्तित्वच नष्ट होण्याची वेळ आली आहे. खरे तर कीर्ती खूप महत्त्वाची. पण इथे द्रौपदी पत्नीला साजेसे आपुलकीने बोलत असताना पतीच्या शरीराला म्हणजे अस्तित्वाला प्राधान्य देते. म्हणून 'सम्भावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते' हे मान्य असूनही द्रौपदी इथे कीर्तीपेक्षा शरीराला महत्त्व देते. सहोक्ती योजताना इथे शरीराला प्रथमेत तर कीर्तीला तृतीया विभक्तीत योजले आहे. इथे द्रौपदीच्या तडफदार व्यक्तिरेखेला खूप मोठ्या उंचीवर नेताना भारवी सहोक्तीचा सुंदर, सहज वापर करतो.

**निरीक्षणे :**

अशाप्रकारे प्रातिनिधिक उदाहरणे पाहिली असता हे लक्षात येते कि सहोक्ति अलङ्कार साहित्यात तुरळकपणे वापरलेला दिसतो. याचे महत्त्वाचे कारण हे असावे कि सह है अव्यय व्याकरणाच्या नियमांनी दृढ बांधले आहे. उपमा, दृष्टांत, उत्प्रेक्षा यासारख्या अलंकारांचा जसा विपुल वापर होतो तसा सहोक्तीचा करणे हे कवींना सहज शक्य झालेले नाही. त्यात प्रधान पद कर्ताकारकात व गौण पद करण कारकात वापरणे बंधनकारक असल्याने तोच आशय खुलविण्यासाठी कवींनी त्याच्या जवळच्या अलंकारांचा वापर केला आहे. उदा. अर्थान्तरन्यास, तुल्ययोगिता इत्यादि मात्र जिथे हा अलंकार वापरला आहे तिथे मात्र आशय खुलवायला त्याचा अत्यंत समर्पक वापर कवींनी करून घेतलेला दिसतो.

दुसरे निरीक्षण असे आहे कि काव्यादर्श या ग्रंथांत दंडी गुण, क्रिया व द्रव्य या आधारे सहोक्ती तीन प्रकारे होते असे सांगतो. मात्र प्रत्यक्ष ग्रंथात मात्र गुण व क्रिया यांनीच होणारी सहोक्ती सांगतो. द्रव्य सहोक्तीचे उदाहरण तो देत नाही. नंतरच्या

काव्यप्रकाश, साहित्यदर्पण आणि कुवलयानंद या ग्रंथामध्ये सहोक्तीचे असे प्रकार केलेले दिसत नाहीत.

**संदर्भ :**

१) काव्यमीमांसा हा साहित्याशास्त्रीय ग्रंथ इसवीसनाच्या दहाव्या शतकात राजशेखर या विदर्भातील कवीने लिहिला.

२) रुय्यक हा बाराव्या शतकातील एक साहित्यशास्त्रकार होता. त्याचा अलंकारसर्वस्व हा ग्रंथ प्रसिद्ध आहे.

३) अप्पय दीक्षित विरचित कुवलयानंद - अलंकारसुरभी व्याख्या- डॉ. भोलाशंकर व्यास- चौखम्भा विद्याभवन, वाराणसी पंचम संस्करण- १९८९

४) आचार्य दंडीप्रणीत काव्यादर्श - शशिप्रभा व्याख्या -संपादक व व्याख्याकार डॉ. जमुना पाठक, चौखम्भा कृष्णदास अकादमी, वाराणसी, प्रथम संस्करण २००५

५) विश्वनाथ विरचित साहित्यदर्पण- मंजू संस्कृत व्याख्या -आचार्य लोकमणी दाहाल आणि डॉ. त्रिलोकीनाथ द्विवेदी (७-१० परिच्छेद)- चौखम्भा सुरभारती प्रकाशन, वाराणसी, संस्करण २०१५

६) महाकवी कालिदास विरचित मेघदूत - चित्रशाळा प्रकाशन, पुणे, भाषांतरकार कै. रामचंद्र गणेश बोरवणकर, संपादक कै. रामचंद्र दत्तात्रेय किंजवडेकर, द्वितीयावृत्ती एप्रिल १९५८

◆◆◆